जा.क्र. १०३/सहपोआ/पोउआ/(अभि)/२०१६
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
यांचे कार्यालय.
दिनांक :— ०५/०२/२०१६

प्रेषक :— मा. सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई.

क्र. पोमसं/२१/७२७२/सोसायटी सुरक्षा/५६/२०१६, दि. ०१/०२/२०१६

<u>विषय</u> :— को. ऑप. हौसिंग सोसायटी, खाजगी कार्यालये व धार्मिक ठिकाणी यांच्या सुरक्षेबाबत काय करावे व काय करू नये. (Do’s & Don’ts)

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, १) को. ऑप. हौ. सोसायटी, २) खाजगी कार्यालये व ३) धार्मिक ठिकाणे यांची सुरक्षा हा नेहमीच प्राधान्याचा विषय आहे. बऱ्याच वेळा गुन्हा झाल्यानंतर आपण सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याकरीता संबंधीताना कळवितो. वास्तविक यातील काही सूचना हया इमारत बांधतेवेळीच त्यासंबंधी काळजी घेणे आवश्यक असते.

२. सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, १) को. ऑप. हौ. सोसायटी, २) खाजगी कार्यालये व ३) धार्मिक ठिकाणे यांच्या सुरक्षेकरीता काय करावे व काय करू नये याबाबत खालील सूचना अंमलात आणाव्यात. अशीच व्यवस्था ज्यांच्या घरात मोठया प्रमाणात दागिने, रोख रक्कम असेल, त्यांनी व जोखमीच्या वस्तु विकणाऱ्या दुकानात करण्यासाठी कळवावे.

अ) को—ऑप. हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारत.

## <u>(१) को—ऑप. हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारतीबाबत करावयाच्या उपाययोजना.</u>

१ अस्तित्वात असलेल्या हौसिंग सोसायटीचे कंपाउंड मजबुत व त्यावर काटेरी तारेच्या जाळया बसवुन घ्याव्यात.

२ हौसिंग सोसायटी मध्ये येण्या—जाण्यासाठी एकापेक्षा जास्त प्रवेशद्वार असल्यास इतर प्रवेशद्वार बंद करून शक्यतो एकच प्रवेशद्वार ठेवावे.

३ बिल्डींग मधील सर्व फ्लॅटच्या दर्शनि दरवाज्यास तसेच सर्व प्रवेशद्वारास लोखंडी ग्रील बसवावे व त्यास चांगल्या दर्जाचे कुलूप बसवावे.

४ इमारतीच्या सर्व बाजूस चांगली प्रकाश व्यवस्था करण्यात यावी.

५ मुख्य प्रवेशाच्या ठिकाणी तसेच इमारतीच्या चारही बाजुनी सर्व ॲगल्स सीसीटीव्हीद्वारे कव्हर होतील अशाप्रकारे सीसीटीव्ही पुरेशा प्रमाणात लावावेत.

६ को.ऑप हौसिंग सोसायटीच्या क्षेत्रानुसार पुरेशा प्रमाणात तरूण व सुदृढ सुरक्षा रक्षक ठेवण्यात यावेत. त्याप्रमाणे सोसायटीमध्ये येणाऱ्या व्यक्तींबाबत माहितीची नोंद घेण्यासाठी नोंदवही ठेवुन त्यामध्ये त्या व्यक्तीचे नांव, पत्ता, मोबाईल नंबर, कोणाकडे जाणार आहे इ. बाबत नोंद करावी.

७ सोसायटीमध्ये ठेवण्यात येणारे सुरक्षा रक्षकांचे चारिज्य पडताळणी करून घ्यावी. तसेच त्याचेकडून त्याचे फोटो व वैयक्तिक माहिती घेवुन तशी नोंद सोसायटीच्या कार्यालयात करून ठेवावी.

८ रात्रगस्तीच्यावेळी सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य व्यवस्थित बजावत आहेत किंवा नाही याबाबत सोसायटीच्या कार्यालयास कळवावे व त्याच्या नोंदवहीत भेट दिल्याची नोंद करावी.

९ सोसायटी/सुरक्षा रक्षकाकडे जवळील पोलीस ठाण्याचा दुरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.

१० को.ऑप हौसिंग सोसायटीमध्ये पोलीस ठाणेस/चौकीस तात्काळ संपर्क होईल अशी अलार्म सिस्टीम ठेवण्यात यावी.

११ सोसायटी मध्ये नेहमी येणारे वर्तमानपत्र विक्रेते, सफाई कामगार, ड्रायव्हर, लॉन्ड्रीवाले, भाजी विक्रेते यांची वेगळी नोंदवही ठेवण्यात यावी.

१२ बाहेरगांवी जाताना स्थानिक पोलीस ठाणेस तसेच शेजाऱ्यास कळवावे, तसेच घरातील मौल्यवान वस्तू, पैसे व दागीने हे बॅकेच्या लॉकरमध्ये ठेवावे, तसेच मौल्यवान वस्तुंचा विमा करावा.

१३ सोसायटीमध्ये इमर्जन्सी लाईट व्यवस्था असावी.

**को—ऑप. हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारतीबाबत काय उपाययोजना करू नये.**

१ घराला लावण्यात येणारे ग्रील हे हलक्या प्रतिचे नसावे.

२ रात्रीचे वेळी घराचा दरवाजा उघडताना बाहेरील व्यक्तिीची ओळख पटल्याशिवाय दरवाजा उघडू नये.

३ को.ऑप हौसिंग सोसायटी मध्ये पडीक/निर्जन भाग ठेवू नये.

४ घरात अनावश्यक मौल्यवान वस्तु व दागिने, पैसे न ठेवता ते बॅकेतील लॉकरमध्ये ठेवावेत.

५ अनोळखी व्यक्ती, सेल्समन, सेल्सगर्ल किंवा फिरते विक्रेते यांचेवर विश्वास ठेवू नये, सोने उजळुन देणारे व्यक्ति तसेच इतर काही कारणे सांगुन येणारे व्यक्तिंना अजिबात प्रवेश देवु नये.

६ मौल्यवान वस्तु उघडयावर अथवा खिडकीजवळ त्या सहज काढुन घेता येतील अशा जागी ठेवू नये.

७ पोलीस ठाणेकडून चारिञ्य पडताळणी केल्याशिवाय सुरक्षा रक्षक नेमू नये.

**(२) खाजगी कार्यालया मध्ये काय करावे याबाबत.**

१ अस्तित्वात असलेले कार्यालय आर्थिक व्यवहार असलेले कार्यालय (बॅका, पतसंस्था, चीटफंड, इत्यादी) इमारतीचे सुरक्षा ऑडीट करून कमतरता असलेल्या बाबी उदा. एकच प्रवेशद्वार त्यांस Z टाईप प्रवेशद्वार व एक्झीट ठेवावे.

२ खिडक्या व दरवाजे यांच्या ग्रिल्स स्क्रुवर फिट केलेल्या नसाव्यात, तर त्या इमारतीचे भिंतीत फिक्स कराव्यात.

३ सेंट्रल लॉक सिस्टीम व सीसीटीव्ही यंत्रणा नसेल तर कार्यालयाच्या आतील व बाहेरील बाजुस बसवून घ्यावी. तसेच alarm व्यवस्था करावी.

४ कॅश काउंटर जाळीचे असावे व आर्थिक व्यवहार चालणाऱ्या कार्यालयां मध्ये आवश्यकतेप्रमाणे बंदुक परवानाधारक सुरक्षा रक्षक नेमावा.

५ आपत्कालीन परिस्थीती संबंधाने उपाययोजना करण्याचे दृष्टीने कार्यालयाचे ठिकाणी अंतर्गत रस्ते पुरेशे रूंदीचे असावेत.

६ भिंती व स्ट्रॉगरूम भक्कम व कार्यालयाचे प्लॅस्टर करतेवेळी त्यामध्ये जाळी टाकुन करावे.

७ कार्यालयात नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक त्यांचे फोटो, वैयक्तिक माहितीची स्वतंत्र फाईल ठेवावी.

८ कार्यालयामध्ये येणारे इसमांची नोंदणी/माहिती नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचेकडे ठेवावी.

९ खाजगी कार्यायामध्ये काही घटना घडल्यास अशावेळी पोलीस ठाणेस/चौकीस तात्काळ संपर्क होईल अशी स्वयंचलीत अलार्म सिस्टीम ठेवण्यात यावी व त्याची बटणे दोन ते तीन ठिकाणी ठेवावीत.

**खाजगी कार्यालया मध्ये काय करू नये**

१ कार्यालयास बाहेर जाणारे व येणारे अनेक गेट असु नयेत.

२ आर्थिक व्यवहार चालणाऱ्या कार्यालयामध्ये रोख रक्कम घेवून जाताना एकाच व्यक्तीवर जबाबदारी सोपवू नये. सोबत हत्यारी सुरक्षा रक्षक नेमावा.

**(३) धार्मिक ठिकाणी करावयाच्या उपाययोजना.**

१ अस्तित्वात असलेल्या धार्मिक स्थळांचे ठिकाणी दिवसा/रात्रौ शक्य असल्यास परवानाधारक सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे.

२ धार्मिक ठिकाणी काही अनुचित प्रकार घडू नये या करीता सीसीटीव्ही कॅमेऱ्याची यंत्रणा बसविण्यात यावी, व CCTV ने धार्मिक स्थळाबाहेरील भाग ही कव्हर करावा. मौल्यवान गोष्टीसाठी alarm लावावा.

३ धार्मिक स्थळाचे ठिकाणी दरवाजे मजबुत व भक्कम असावेत.

४ मंदीराचे ठिकाणी दानपेटी जमीनीत भक्कम बसविण्यात यावी त्यावर CCTV चा focus असावा.

५ धार्मिक स्थळाचे ठिकाणी नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षकांची पोलीसांकडून चारिज्याची पडताळणी करूनच त्यांना सुरक्षा रक्षक म्हणुन नेमण्यात यावे.

६ ज्या ठिकाणी मुर्ती आहे, त्याचे दर्शनाकरीता जाणेसाठी महिलांच्या व पुरूषांच्या स्वतंत्र रांगा ठेवण्यात याव्यात व आत येणेसाठी व बाहेर पडणेसाठी वेगवेगळे दरवाजे ठेवावेत.

७ धार्मिक स्थळाचे ठिकाणी पुरेशी लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

८ धार्मिक स्थळांचे ठिकाणी भावीकाकडुन जमा होणाऱ्या रक्कमेची ऑडीट करून घेण्यात यावे.

९ नवीन मंदिराचे बांधकाम करतेवेळी मंदिराचा गाभारा उंच असावा. मंदिर बांधताना आपत्कालीन रस्त्याचेही नियोजन करावे.

१० मौल्यवान गोष्टी वेळोवेळी लिलाव करून रक्कम बॅकेत ठेवावी.

**धार्मिक ठिकाणी काय करू नये याबाबत.**

१ दानपेटया वेळोवेळी रिकाम्या कराव्यात. मंदिरात रात्रीच्यावेळी दानपेटी मध्ये दिवसभरात जमा झालेली रक्कम ठेवण्यात येवू नये.

२ देवीदेवतांच्या अंगावर मौल्यवान दागदागीने ठेवू नये.

३ रात्री सीसीटीव्ही बंद करू नये.

**(ब) इमारत बांधतेवेळी सुरक्षीततेच्या दृष्टीकोनातून काय करावे.**

१ इमारतीचे चारही बाजुला मोकळी जागा सोडावी, जेणेकरून काही घटना घडल्यास सुरक्षेच्या दृष्टीने हालचाली करता येतील.

२ नवीन बांधकाम करताना खिडकीचे लोखंडी ग्रिल हे भिंतीत बसवावेत.

३ नवीन बांधकाम करताना चांगल्या प्रतीचे साहीत्य वापरावे.

४ मोठे कार्यालय/मॉल/इमारती यांचा प्रवेशद्वार व बाहेर जाण्याचा दरवाजा मोठा असावा.

५ नवीन इमारतीचे वॉल कंपाउंड उंच व त्यावर तारेचे कुंपन असावे.

६ धार्मिक स्थळाचे दरवाजे चांगल्या प्रतीचे असावेत व दानपेटया जमीनीमध्ये या फिट असाव्यात.

७ इमरजन्सी/सिक्युरिटी अलार्म डे/नाईट मोड असणारा असावा, तसेच त्या संबंधी नजीकच्या पोलीस ठाण्यास स्वयंचलीत कॉल होण्याची सुविधा असावी.

**<u>इमारत बांधतेवेळी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून काय करू नये.</u>**

१ इमारतीचे खिडक्या/दरवाजे स्क्रु ने फिट केलेले नसावेत.

२ हलक्या प्रतीचे साहित्य वापरू नये.

३ इमारतीला अनेक प्रवेशद्वार नसावेत.

सही/—
(प्रवीण दीक्षित)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.